दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार, 2 मार्च 2026 | अंक क्र. 282 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाच्या वापराची तसेच बिबट्या प्रश्नावर उपाययोजनांची आमदार सुरेश आण्णा धस यांची मागणी

■ आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ दरम्यान सभागृहात बोलताना सुरेश आण्णा धस यांनी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची मागणी केली. राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेती अधिक शाश्वत बनवणे आणि महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत सक्षम करण्यासाठी “AI for Agri 2026” ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हवामान अंदाजावर आधारित पेरणी सल्ला, कीड-रोग ओळख, माती परीक्षणावर आधारित खत शिफारस, स्मार्ट सिंचन प्रणाली तसेच बाजारभावाचा अंदाज शेतकऱ्यांना उपलब्ध करून देता येईल, असे त्यांनी सांगितले.तसेच यावेळी प्रत्येक तालुक्यात AI आधारित कृषी मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे.शेतकऱ्यांना अनुदानित माती सेन्सर व स्मार्ट सिंचन प्रणाली उपलब्ध करून द्याव्यात.



कृषी विद्यापीठांमध्ये AI संशोधनासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करावेत.ग्रामीण भागात मजबूत इंटरनेट सुविधा उपलब्ध करावी. कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना AI विषयक प्रशिक्षण द्यावे.दरम्यान, आमदार धस यांनी पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि बीड जिल्ह्यांमध्ये वाढत चाललेल्या बिबट्या समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ग्रामीण भागात बिबट्यांच्या हालचाली वाढत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

खेड-मंचर येथील रेस्क्यू सेंटरचे काम कौतुकास्पद असल्याचे सांगत त्यांनी गावपातळीवर बिबट्याबाबत जनजागृती मोहीम राबवावी. एलईडी स्क्रीनद्वारे सूचना व माहिती उपलब्ध करून द्यावी. संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. बिबट्यांच्या हालचालीबाबत इशारा देणारी यंत्रणा उपलब्ध करावी.तसेच बिबट्या आणि अन्य वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या शासन निर्णयात स्पष्टता आणून बाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची मागणीही त्यांनी केली. शेती ही राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि ग्रामीण भागातील नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक असल्याचे आमदार सुरेश धस यांनी अधोरेखित केले.

## सुरेश धस यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी; समर्थकांची पोलिसांत तक्रार

■ आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा लोकप्रिय लोकनेते सुरेश धस यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि जीवे मारण्याची उघड धमकी देणारी पोस्ट व्हायरल झाल्याने मतदारसंघात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी आ. धस यांचे समर्थक व कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन आष्टी, अंभोरा आणि कडा येथे लेखी तक्रार दाखल करून संबंधितावर तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे.

समर्थकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी फेसबुक या सामाजिक माध्यमावर एका व्यक्तीच्या अकाउंटवरून आ. धस यांच्याविरोधात अत्यंत भडकावू व धमकीच्या स्वरूपाचा मजकूर पोस्ट करण्यात आला. संबंधित पोस्टमध्ये आ. धस यांचा उल्लेख करत उघड इशारा देण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, सदर पोस्टचा सरळ अर्थ आमदारांना जीवे मारण्याची धमकी असा होत असून, त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्रकारच्या बेजबाबदार व चिथावणीखोर वक्तव्यांमुळे समर्थकांमध्ये संतापाची भावना निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो, असेही तक्रारदारांनी म्हटले आहे.




लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींविरुद्ध उघड धमक्या देणे ही अत्यंत गंभीर व दंडनीय बाब आहे. सामाजिक माध्यमांचा गैरवापर करून सार्वजनिक शांतता भंग करण्याचा आणि वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही समर्थकांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तातडीने कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने संबंधित पोस्टची पडताळणी सुरू केली असून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. या घटनेच्या निषेधार्थ आष्टी, अंभोरा व कडा येथे आ. धस यांचे हजारो समर्थक उपस्थित राहून संताप व्यक्त केला.

## विविध कार्यकारी सोसायटीचे मसलाचे नूतन चेअरमन बिडवे



■ लातूर प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील मौजे मसला येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी नामदेव बिडवे यांची तर व्हाईस चेअरमनपदी सुखदेव कुकर यांची नुकतीच एक मताने निवड झाली असून या निवडीबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी सोसायटीच्या नूतन पदाधिकारी आणि संचालकासह भाजपाच्या प्रमुखांनी आ. कराड यांचा यथोचित सत्कार केला.

लातूर तालुक्यातील मौजे मसला येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या निवडणुकीत आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील पॅनलने एक हाती सत्ता मिळवली. या सोसायटीच्या चेअरमन आणि व्हाईस चेअरमन पदासाठी अडीच वर्ष कालमर्यादा ठरवून सुरुवातीला चंद्रकांत वांगसकर यांची चेअरमनपदी तर व्हाईस चेअरमन पदी प्रभू औताडे यांची निवड झाली होती अडीच वर्षाचा कार्यकाळ संपल्याने दोन्ही पदाधिकाऱ्यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामे दिले. त्यानुसार सोसायटीच्या नूतन चेअरमनपदी नामदेव बिडवे यांची तर व्हाईस चेअरमनपदी सुखदेव कुकर यांची नुकतीच निवड करण्यात आली.

मसला सोसायटीच्या आजी, माजी पदाधिकाऱ्यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रविवारी दुपारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपाचे भैरवनाथ पिसाळ, बापूराव बिडवे, दीपक वांगस्कर, सोसायटीचे संचालक मोहन पिसाळ, गहिनीनाथ नाळापुरे, बाबू शेख, रामा आल्टे, बाळू निलंगे, शाहूराज धुमाळ, मल्लिकार्जुन बिडवे, मधुकर वांगसकर यांच्यासह अनेक जण होते.



## चिमुकल्यांचा विज्ञान मेळावा ठरला यशस्वी; ९७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग!

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील तब्बल ९७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध विषयांवर आकर्षक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध बक्षिसेही पटकावली.

विशेष म्हणजे, लहानग्या चिमुकल्यांनी आपल्या प्रकल्पांचे स्पष्ट, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी स्पष्टीकरण देत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीने आणि सादरीकरण कौशल्याने उपस्थित पालक आश्चर्यचकित झाले व अभिमानाने भारावून गेले.

या कार्यक्रमासाठी परीक्षक व प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका डॉ. पूजा तोतला मॅडम, सौ. रुची ठक्कर मॅडम आणि सौ. आकांक्षा सेठिया मॅडम व सौ. शीतल पंपालिया मैडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंदांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. हा विज्ञान मेळावा केवळ प्रदर्शन न राहता, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा आणि त्यांच्या जिज्ञासेला नवी दिशा देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

**यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न**

## भैय्यासाहेब आदोडे यांचा श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्कार देऊन सन्मान

■ परळी / प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक भैय्यासाहेब आदोडे यांचा जेष्ठ विचारवंत व 89 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.


समाजप्रबोधन, स्वच्छता आणि समतेचा अखंड संदेश देणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त परळी येथे भव्य सुवर्ण शतकोत्तर महोत्सवी वर्ष सोहळा दि.23 फेब्रुवारी 2026 रोजी उत्साहात संपन्न झाला. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था परळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक व ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी भूषविले. उद्घाटक म्हणून समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे करण्यात आले होते.

यावेळी राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार सामाजिक कार्यात शिक्षण क्षेत्रात योगदान दिल्याबद्दल भैय्यासाहेब आदोडे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. फुले , शाहू, आंबेडकर चळवळीत सक्रिय असणारे भैय्यासाहेब आदोडे सर हे परळी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमात सहभागी असतात. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.परळी ,रमेश सोनाळे नांदेड, प्रा.डॉ. किशोर वाघ संभाजीनगर, अरविंद कांबळे संभाजीनगर, मनोहर व्हावळे गंगाखेड, पंडित जिंजुर्डे परळी, अनंत इंगळे परळी, जयवर्धन सूर्यवंशी परळी यांना समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रस्ताविकपर भाषणात कार्यक्रमाचे आयोजक पृथ्वी शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक लक्ष्मण वैराळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक पृथ्वी शिंदे तसेच निमंत्रक सुशिल पोटभरे, रोहित झिंजुर्डे, विकास वाघमारे, राहुल सूर्यवंशी, विशाल डोंबे, महेश मुंडे आदींनी परिश्रम घेतले.



# शिलाँग



मेघालय याचा अर्थच आहे मेघांचे निवासस्थान. या भागात पाऊस खूप पडतो. शिलाँगवर ब्रिटीश वास्तू आणि खाद्यपेयांचा दाट पगडा आहे. पाहण्यासारखी अनेक सुंदर ठिकाणे असलेले या राज्यात प्रामुख्याने आदिवासी जमातींची वस्ती आहे. हत्तीचा भास होणारा आणि तीन टप्प्यात पाणी कोसळणारा हाथी झरना हे येथल्या आकर्षणातले मुख्य आकर्षण म्हटले पाहिजे. पाहाल तेथे निसर्गसौंदर्याची रेलचेल असलेले शिलाँग नितांतसुंदर पण छोटेसे शहर आहे. येथून 8 किमीवर असलेला एलिफंटा फॉल पाहायलाच हवा. चेरापुंजी हे सर्वाधिक पावसाचे ठिकाण येथून 56 किमीवर आहे. सततच्या पावसामुळे दाट झाडी आणि अतिविशाल वृक्षांची येथे दाटीच असून त्यातील काही वृक्ष केवळ याच भागात आढळतात. या भागात या अतिविशाल वृक्षांची मुळे आणि फांद्या बांधून मोठमोठे पूल तयार केले गेले असून ते अतिशय मजबूत आहेत. एकावेळी 50 लोक या पुलांवरून सहज जाऊ शकतात.

भारताच्या पूर्वोत्तर राज्यामधील मेघालयची राजधानी असलेले शिलाँग हे ठिकाण देश विदेशातील पर्यटकांना पर्यटनाचा मनमुराद आनंद मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध आहे. भारतीय संस्कृतीचे वेगळे दर्शन आणि भौगोलिक विविधता यांचे सुंदर दर्शन येथे घडते. बारमाही वाहणारे झरे, धबधबे, चोहोबाजूंना असलेली हिरवाई, दर्या, डोंगर आणि नाना प्रकारच्या जातींचे महाकाय वृक्ष, या वृक्षांच्या फांद्या आणि मुळांपासून बनविले गेलेले सुंदर पूल अशी भरपेट मेजवानी पर्यटकांना भुरळ घालत असते.



डॉन बास्को सेंटर हे सांस्कृतिक संग्रहालय, शिलाँग पीक हा 1966 मीटर उंचीचा भाग, घोड्याच्या नालाचा आकार असलेले मानवनिर्मित वार्डस सरोवर, बोटॅनिकल गार्डन, स्प्रेड इगल फॉल हा रूंद धबधबा आणि अ्रनोखे व प्रेक्षणीय असे बटरफ्लाय संग्रहालय ही येथील आणखी काही आकर्षणे. हे संग्रहालय फुलपाखरांना समर्पित आहे.

## कसे जाल ?

शिलाँगला जाण्यासाठी गुवाहाटीपासून विमान, बस, टॅक्सी अशा सेवा उपलब्ध आहेत. मार्च- एप्रिल आणि आक्टोबर नोव्हेंबर हा काळ येथे भेट देण्यासाठी चांगला काळ आहे

# भरतपूर अभयारण्य



राजस्थानातील केवलादेव या नावाने ओळखले जात असलेल्या या जंगलाचे नामकरण आता भरतपूर असे केले गेले आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले हे अभयारण्य हजारो जातींच्या स्थलांतरीत पक्षांसाठी प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध ब्रिटीश पक्षीतज्ज्ञ सर पीटर स्कॉट यांनी या अभयारण्याचे वर्णन जगातील सर्वात सुंदर पक्षी ठिकाण असे केले आहे. हे जंगल 250 वर्षांपासूनचे असून जंगलात असलेल्या शिवमंदिरावरून त्याला केवलादेव असे नाव पडले होते. हे शंकराचे एक नाव आहे. 10 मार्च 1982 या दिवशी त्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा दिला गेला व 1985 साली ते जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले गेले.

## पक्ष्यांचा स्वर्ग

नेहमी आढळणाऱ्या पक्ष्यांबरोबरच येथे बदके, ग्रेटर स्पॉटेड इगल्स ( गरूड ), इस्टर्न इंपिरियल ईगल्स, आढळतात तसेच नामशेष होऊ घातलेले सायबेरियन क्रेन यांचे हे ब्रिडींग ठिकाण आहे. त्याबरोबरच पेलिगन, रेड काईट, गिधाडे, मार्बल्ड टील, बैकल टील या पक्ष्यांचा हा स्वर्ग म्हणून ओळखला जातो. सस्तन प्राण्यांत लांडगे, तरस, नीलगाई, ठिपक्यांची हरणे आढळतात.



या जंगलाच पक्षी इतक्या प्रचंड संख्येने आहेत की 1938 साली तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड लिडिग्लो यांनी एकाच शिकारीत 4273 पक्षी मारले होते अशी कथा सांगतात. अभयारण्य घोषित होण्यापूर्वी हे जंगल भरतपूर च्या महाराजांचे शिकारस्थळ म्हणून ओळखले जात होते. या पक्षीजंगलाचे मुख्य आकर्षण आहेत सारस पक्षी. अभयारण्याची वेळ सूर्योदय ते सूर्यास्त अशी असली तरी पक्षी पाहायचे असतील तर अगदी पहाटेच म्हणजे सूर्योदयापूर्वीच येथे पाहोचायला हवे.

## जाण्यासाठी मार्ग

येथे जाण्यासाठी जवळचा विमानतळ जयपूर आणि दिल्ली आहेत. रेल्वेने भरतपूर स्टेशनला उतरता येते. हिवाळा येथील चांगला हंगाम. नोव्हेंबर ते मार्च या काळात येथे स्थलांतरीत पक्षी खूप मोठ्या संख्येने येतात.



# सांस्कृतिक खजिन्याचे कच्छ

देशामध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिक पर्यटन स्थळे आहेत. मात्र कच्छ हे आपल्या वेगळेपणामुळे आणि सौंदर्यामुळे तग धरून उभा आहे. हा देशातील सर्वात मोठा जिल्हा असल्याने एक भौगोलिक आश्चर्य तर आहेच पण येथे सांस्कृतिक खजिना दडलेला आहे. यामुळे पर्यटकांनी कोणताही विचार न करता याचा प्रवास सुरू करून सुंदर आठवणी घेऊन जावे.

## कच्छचे रण

कच्छचे रण वास्तव्यासाठी योग्य ठिकाण नसले तरीही पर्यटकांनी या ठिकाणाला नक्की भेट द्यावी. येथील क्षारयुक्त जमिनीवर जेथे दृष्टी जाईल तेथे दूरपर्यंत मैलोन मैल पांढरी रेती पसरलेली बघायला मिळते. तुम्ही त्याचे ते रुप डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठवून ठेवू शकता. तसेच दिवसा सूर्याच्या किरणांमध्ये न्हाऊन निघालेले लुकलुकणारे रेतीचे कण अनुभवता येतात आणि तर रात्री चंद्राचे आगमन झाल्यानंतर निळसर प्रकाशामध्ये न्हाऊन निघालेला हा प्रदेश थेट चित्रातून बाहेर उतरल्यासारखा भासतो.

## भूजमधील सहल

भूज कच्छची राजधानी आहे आणि हे शहर 16 व्या शतकातील एक संस्थानही होते. येथील विखुरलेल्या वैभवशाली आणि उत्तमरित्या जतन केलेल्या राजवाड्यांच्या स्वरुपातील या शहराचा राजेशाही थाट अजूनही पाहता येतो. यामध्ये सर्वोत्तम कल्पना म्हणून ताज महाल, आईना महल यांचा समावेश आहे.

## मांडवीमध्ये पक्षी निरीक्षण

मांडवी भारतातील जुन्या बंदरापैकी एक आहे आणि आज येथे अनेक पक्षी निरीक्षक मोठ्या प्रमाणात येतात. अक्षरशः वेड्यासारखे येथील अगणित प्रकारच्या पक्ष्यांचे सौंदर्य अनुभवतात. येथे पेलिकन्स, फ्लेमिंगो आणि अनोख्या प्रकारची बदके या सारख्या असंख्य पक्षांच्या प्रजातींचे थवे कोणत्याही पाणीसाठ्याजवळ आढळतात. मग ते तळे असो, दलदलीचा प्रदेश असो किंवा वाहणारे पाणी असो.



## कशी भेट द्याल ?

भूजमध्ये रेल्वे स्टेशन आणि विमानतळ आहे. तुम्ही मुंबई, अहमदाबाद, राजकोट, भावनगर या ठिकाणांपासून भूजसाठी बसेस घेऊ शकता.

# सैफ उल मलूक

# पाकचे सुंदर सरोवर

पाकिस्तान म्हटले की शत्रू राष्ट्र असा भारतीयांचा समज होतो तसेच जगभरातील देशात पाकिस्तानची ओळख दहशतवादाला खतपाणी घालणारा देश अशी झाली आहे. मात्र हा देश अनेक नितांत सुंदर पर्यटनस्थळांनी परिपूर्ण असल्याची माहिती खूपच थोड्या लोकांना आहे. भारत पाक सीमेवरील तणाव हा नेहमीच धगधगता मुद्दा असला तरी आजही अनेक पाकिस्तानी भारतात पर्यटनासाठी येतात तसेच अनेक भारतीयही पाकमध्ये पर्यटनासाठी जात असतात.

## मे, जूनमध्ये जाणे उत्तम

या ठिकाणी जाण्यासाठी बाकी सोपस्कार करण्यापूर्वी हे लक्षात ठेवावे की मे जून हा येथे जाण्यासाठीचा सर्वात चांगला काळ आहे. थंडीत हे सरोवर बर्फाने गोठलेले असते त्यामुळे चहूबाजूला बर्फाशिवाय कांही दिसत नाही हे लक्षात ठेवून आपले प्रवासाचे शेड्यूल ठरवावे.

पाकिस्तानच्या खैबर जिल्ह्यातील सैफ उल मलूक सरोवर हे असेच भारतीय पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ आहे. पशिर्यन युवराज सैफ उल मलूक यांच्या आठवणीत रमलेले हे स्थळ येथील अतिरम्य सरोवरासाठी आणि नितांतसुंदर निसर्गासाठी प्रसिद्ध आहे. या सरोवरात मिळणारे ब्राऊन ट्राऊट मासेही अतिशय प्रसिद्ध आहेत. सात किलो वजनाचे हे मासे पर्यटकांसाठी खास आकर्षण आहेत. आपल्या नंदनवनाची म्हणजे काश्मीरची आठवण करून देतील असे निळे बर्फाचे डोंगर, दूरवर पसरलेली हिरवाई, नितळ पाणी आणि स्वच्छ ताजी हवा तसेच मनाला निववणारी शांतता ही येथली खास वैशिष्ठये.





# आखाती देशातील ओमान

आखाती देशांकडे अनेकदा वेगळ्या नजरेने बघितले जाते. मग ते दुबईसारख्या देशातील सर्व सुविधांनी युक्त जीवनशैली असो किंवा सौदी अरेबियाचे प्रचंड वाळवंट. परंतु येथील ओमान हे एक विशेष स्थान लक्ष वेधून घेते ते त्याच्या अद्वितीय भूप्रदेश आणि संस्कृतीमुळेच. तुम्ही निश्चितपणे ओमानच्या प्रवासाची योजना का करावी हे जाणून घ्या...



## फ्रॅन्किसेन्स रोड

प्राचीन फ्रॅन्किसेन्स रोडवर सलालाहची घरे आहेत. शहराच्या कारावान मार्गावर या घरांची सुधारणा केली आहे. हे स्थान येथे आढळणाऱ्या सुवासिक राळसाठी प्रसिद्ध आहे. फ्रॅन्किसेन्स लॅण्ड संग्रहालयाला भेट द्या. जी ओमनच्या तेजस्वी आणि रंगीत इतिहासाला उज ळा देते. फ्रॅन्किसेन्सची झाडेही आपण येथे पाहू शकतो. येथे या स्फटीकांची चांगल्या दरामध्ये विक्री होते. शबा राणीच्या काळात याच्या विक्रीला सुरुवात केली होती.

## वाडीमध्ये क्षणभर विश्रांती

मस्कट-सूर महामार्गावर मध्य-पूर्वमध्ये एक नयनरम्य ड्राइव्ह आहे. अरेबिया गोड्या पाण्यातील तलाव आहे. हा जलस्त्रोत वाडीज म्हणून ओळखला जातो. ही उष्णता कमी करण्याची उत्तम जागा आहे. वाडीला सहसा वाळवंटात वाळूचा खडक व्यापलेला आहे. त्याच्या भव्य भिंती करून तलावाला घेरले जाते. मात्र ओमन वेशभूषांबाबतीत पुराणमतवादी आहे. यामुळे सभ्यतेबाबत कठोर मार्गदर्शक तत्वांची खात्री करून घ्या.

## रस-अल-जिंझ कासव केंद्र

रस-अल-जिंझ कासव केंद्रामध्ये ऑलिव्ह रिडले समुद्रातले आणि हिरव्या समुद्रातले दुर्मिळ प्रजातीचे कासव आढळण्याची उत्तम जागा आहे. टूर मार्गदर्शक आपल्याला प्राण्यांबद्दल माहिती देतो. तुम्ही रात्री उशिराची टूर घेतली तर वॉडलिंगसारखे वाळूमध्ये चटकन न आढळणारा प्राणी पाहू शकता.

# निसर्ग सौंदर्याने नटलेले अंदमान

बंगालच्या उपसागरात असलेली अंदमान आणि निकोबार ही बेटे भारताच्या मुख्य भूमीपासून दूर आहेत. या बेटांना आगळ्या-वेगळ्या संस्कृतीचे आणि अनोख्या निसर्ग सौंदर्याचे वलय लाभले आहे. सहलीला गेल्यावर नक्की पाहावा असा हा द्वीपसमूह आहे.


## नीरव शांततेसाठी

तुम्ही एखाद्या शांत जागेचा शोध घेत असाल तर अंदमान बेट एक उत्तम पर्याय आहे. उष्ण कटिबंधीय प्रदेशातील बंगालच्या खाडीजवळ हे बेट आहे पांढरे शुभ्र समुद्रकिनारे आणि हिरवेगार दाट जंगल हे अंदमानचे वैशिष्ट्य. निरनिराळे प्रकारचे प्राणी आणि वनस्पती यांच्या संचाराने या बेटाची शोभा अजूनच वाढते. साहसप्रेमी पर्यटकांसाठी स्कुबा ड्रायव्हींग, स्नॉरकेलिंग आणि मासे पकडण्यासाठी अंदमानचे समुद्र म्हणजे पर्वणीच.

उष्ण कटिबंधीय वनांनी युक्त घनदाट जंगले आणि लांबच लांब वाळूचे समुद्रतट असलेल्या प्रसिद्ध हॅवलॉक बेटाचा दौरा तर प्रत्येक पर्यटकाने करावा असाच आहे. हॅवलॉक, विजयनगर, राधानगर आणि एलिफंट समुद्रतट म्हणून प्रसिद्ध आहे. येथे तुम्ही स्कुबा डायविंग, स्नोर्कलिंग आणि मासेमारी करू शकता.

अंदमानची राजधानी पोर्ट ब्लेअर येथे एक ब्रिटीशकालीन ऐतिहासिक तुरुंग आजही भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या आहूतीची साक्ष देत उभे आहे. आता त्याचे रुपांतर एका स्मारकात करण्यात आले आहे. निसर्गसंपन्नता आणि ऐतिहासिक वारसा या दोन्ही गोष्टी जर सोबतच अनुभवायच्या असतील तर याला भेट देणे योग्य ठरेल.

# मन:शांतीची अनुभूती देणारी चामरलेणी



म्हसरूळ (नाशिक) येथील चामरलेणी (गजपंथ) जैनधर्मीयांचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. देशभरातून भाविक व पर्यटक या क्षेत्राला वर्षभर भेट देतात. त्यावर एक दृष्टिक्षेप... म्हसरूळ येथील चामरलेणी (गजपंथ) हे दिगंबर जैन पंथीयांचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. ही लेणी केवळ ऐतिहासिक वा धार्मिकच नव्हे, तर अनोख्या निसर्गसौंदर्याचं शांतीसह अनुभूती देणारे सिद्धक्षेत्र बनले आहे. भाविक दूरवरून येथे येऊन आपले दोष, राग-द्वेष, वासना, अहंकार या सर्वांचाच या शांतिस्थळावर त्याग करतात. येथे प्रत्येक ऋतूत भाविकांची वर्दळ असते.

## शुभ्र लेण्यांचे दर्शन

म्हसरूळ गावापासून 4 किलोमीटरवरील निसर्गसौंदर्याने नटलेला पर्वत पांढऱ्या शुभ्र लेण्याला छातीवर घेऊन उभा असतो. हे दृश्य पाहून भाविक या पर्वताच्या प्रेमातच पडतो. उल्हसित मनाने वाटचाल करतो या शांतिस्थळाकडे. अशा उत्साहपूर्ण वातावरणात भाविकासमोर या पर्वताच्या पायथ्याशी असेलेले मंदिर येते. त्याच्या छोट्या गाभाऱ्यांत चारही दिशांना श्वेतवर्णाच्या पद्मासनातील मूर्ती आहेत. तेथेच दोन फूट उंचीची पार्श्वनाथांची श्वेतवर्ण पद्मासन प्रतिमा आहे. जवळच क्षेमेंद्रकीर्तींची समाधी आहे. या मंदिरातून बाहेर पडताच पर्वतावरील लेणी खुणावत असतात. हिरव्या रंगाचे प्रदर्शन करणारा हा पर्वत काळ्याशार दगडांची वाट अंगभर घेऊन छातीवरील लेण्यात येण्याचे जणू आव्हानच देत असतो.

## श्वेतवर्ण चरण

सृष्टीसौंदर्य न्याहळत सुमारे 435 पायऱ्या चढून जेव्हा यात्रेकरू या पर्वतावरील गुंफांत प्रवेश करतो तेव्हा त्याला प्रथम जाणवते ती विलक्षण निरव शांतता. सुरुवातीला उजव्या हाताला छोट्या शिखराखाली तीन श्वेतवर्ण चरण आहेत. ते सुदर्शन, नंदी आणि नंदीमित्र या बलभद्रांचे आहेत. शिखरावर सुव्रत, सुधर्म, गजकुमार, अचल आणि विजय या बलभद्रांचे चरण आहेत. त्यांच्याजवळच नव्यानेच उभारलेली दोन मंदिरे आहेत. एका गुंफेत भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा आहे. ती उत्खननात मिळाली आहे. ती पूर्ण आणि अत्यंत मनोहरी श्यामवर्णीय मूर्ती नजर खिळवून ठेवते. ती दहा फूट चार इंच उंचीची पद्मासन प्रतिमा आहे. चारित्र्य चक्रवर्ती आचार्य शांतिसागरजींच्या मार्गदर्शनाखाली तिची स्थापना केली आहे.


## प्राचीन गुफा

मार्गशीर्ष शुक्ल 10, संवत 1664 मधील ही घटना आहे. दुसरे मंदिर वीर संवत 2460 मध्ये उभारले. उजव्या बाजूला एक फूट पाच इंच उंचीची कत्थई वर्णाची भगवान पद्मप्रभू यांची, तर डाव्या बाजूला भगवान वासुपूज्य यांची प्रतिमा आहे. या प्रतिमांशेजारीच तीर्थस्थळांवरील शांततेची अनोखी अनुभूती देणाऱ्या दोन प्राचीन गुंफा आहेत. त्या भाविकांना वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. स्वत्व विसरायला लावतात. या गुफांचा इतिहास ज्ञात नाही. प्रतिमांना लेप लावलेला आहे. त्यामुळे त्यांची निर्मिती कोणत्या काळात झालेली आहे, याचे अनुमान निघत नाही. समोर वेदीवर एक शिलाफलकात तीन श्यामवर्णीय,चार फूट पाच इंच उंचीच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिमांच्या दोन्ही बाजूला स्तंभ आहेत. त्यावर सर्वांत वर पद्मासन, मध्ये जंजीर आणि खालच्या बाजूला खड्गासन प्रतिमा अंकित आहेत. प्रतिमांवर छत्र असून, त्याच्या दोन्ही बाजूंना तूर्यवाद्ये आहेत. या छत्रावर एका हातात चामर, तर दुसऱ्या हातात फळे घेतलेली देवी, तसेच त्याच्याहीवर किचक आहे. बाजूलाच भक्त हात जोडून बसला आहे. या गुंफांत पद्मासन आणि खड्गासनस्थ मूर्ती आहेत. या गुंफेतील बाहेरच्या कक्षात भिंतीतच साडेसहा

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

दैनिक अतुल्य महाराष्ट्र





# सांगली जिल्ह्यात इयत्ता चौथी, सातवीसाठी डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी ; सांगली जिल्हा परिषदेच्या अभिनव उपक्रम

## चौथीचे 19931, सातवीचे 6668 विद्यार्थी बसले परीक्षेस

■ **शिराळा/ प्रतिनिधी**

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने इयत्ता ४ थी आणि इयत्ता ७ वी साठी घेण्यात आलेली डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी जिल्ह्यातील २१४ केंद्रावर उत्साहात पार पडली. सांगली जिल्हा परिषद स्वीय निधीतून जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळेमधील विद्यार्थ्यांच्यासाठी इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी साठी डॉ.पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. या चाचणीसाठी इयत्ता चौथी वर्गासाठी २१३०८ प्रविष्ट विद्यार्थी व अतिरिक्त विद्यार्थी २६४ असे एकूण २१५७२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १९९३१विद्यार्थी उपस्थित होते व १६४१ विद्यार्थी अनुपस्थित होते. त्यांची गुणवत्ता चाचणी १३६ केंद्रातून घेण्यात आली. तर इयत्ता सातवी वर्गासाठी प्रविष्ट विद्यार्थी ७३०६ व अतिरिक्त विद्यार्थी ८२ असे एकूण ७३८८ विद्यार्थी चाचणीस बसले होते. त्यापैकी ६६६८ उपस्थित व ७२० अनुपस्थित विद्यार्थी होते. त्यांची गुणवत्ता चाचणी ७८ केंद्रावर घेण्यात आली, असल्याची माहिती सांगली जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी दिली.

या गुणवत्ता चाचणी परीक्षांना जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड, उपशिक्षणाधिकारी नागेश ठोंबर यांनी कुपवाड व बामनोळी या परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. तसेच जिल्हास्तरावरून लेखाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व समग्र शिक्षा अधिकारी, कर्मचारी यांनी भेटी दिल्या. तालुका स्तरावरून गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व समग्र शिक्षा अधिकारी,कर्मचारी यांच्यामार्फत केंद्रांना भेटी देण्यात आल्या. सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी इयत्ता चौथी व आठवी अत्यंत वस्तुनिष्ठपणे व पारदर्शक पद्धतीने तसेच आनंदी व उत्साही वातावरणात संपन्न झालेली आहे.

डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी इयत्ता चौथी व सातवी या वर्गासाठी घेण्यात आलेल्या चाचणीचा अंतिम निकाल व जिल्हा गुणवत्ता यादी लवकरच घोषित केली केली जाणार आहे. सदर गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची महाराष्ट्र परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या दिनांक २६ एप्रिल २०२६ च्या परीक्षेसाठी पूर्वतयारी केली जाणार आहे. व या प्रयत्नातून सांगली जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी राष्ट्रीय राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये येतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

यासाठी जिल्हास्तर व तालुका स्तरावरून विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. फोटो ओळी : डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी परीक्षा सेंटरला शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी भेट दिली.




# अनंत इंगळे यांना राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्कार प्रदान

## सामाजिक कार्याची दखल ; मान्यवरांच्या हस्ते सन्मान

■ **परळी (प्रतिनिधी)**


राष्ट्रसंत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्कार नगरसेवक अनंत इंगळे यांना प्रदान करण्यात आला. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर, परळी येथे आयोजित भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांना समर्थचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

अनंत इंगळे हे सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, सर्वसामान्य व गरजू नागरिकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असतात. आर्या तशाराच्या चळवळीत सक्रिय सहभाग, विविध सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार आणि नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून ते भीम महोत्सव व अशा अनेक समाज उपयोगी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे. समाजहितासाठी धावून जाणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत सन्मान करण्यात आल्याने परळी शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण आहे. प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस, सहाय्यक आयुक्त मा. विशालजी लोंढे,ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे हस्ते प्रधान व अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

अनंत इंगळे यांना मिळालेला हा 'समाजरत्न' पुरस्कार त्यांच्या निस्वार्थ सेवाभावाची पावती असून, भविष्यातही ते समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सचिव पृथ्वी शिंदे , पत्रकार विकास वाघमारे, सुशिल पोटभरे, रोहित झिंजुर्डे, राहुल सूर्यवंशी , विशाल डोंबे , महेश मुंडे, आदी उपस्थित होते.

# राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ याचे स्वागतच; मग विदर्भातील युवावर्ग रोजगार व शिक्षणासाठी पुण्या-मुंबईत किंवा देशाच्या इतर भागात का जातात?

राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल आहे याचा अभिमान आम्हा सर्वांनाच आहे आणि असायलाच हवा.याचे जितके कौतुक कराल तितके कमी आहे,त्यामुळे याचे स्वागतच. राज्य सरकारने सन २०२९ पर्यंत एक लाख कोटी डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सरकारने निर्धारित केले असून,राज्याची अर्थव्यवस्था आताच ५१ लाख कोटींवर पोहोचली आहे.अशी माहिती माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ ला विधानसभेत दिली.याचे मनापासून स्वागत.कारण राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होणे म्हणजे देशाच्या विकासाला हातभार लावणे होय.परंतु देशाचा केंद्र बिंदू आणि राज्याची उपराजधानी नागपूर आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.याच अनुषंगाने माझ्यामते राज्यातील व विदर्भातील युवावर्गानी रोजगारासाठी नागपूरमध्ये धाव घ्यायला पाहिजे होती, परंतु आज नागपूरसह विदर्भातील युवावर्ग रोजगारासाठी पुण्या-मुंबईत किंवा इतर राज्यात का धाव घेत आहे याचा गांभीर्याने सरकारने विचार करण्याची गरज आहे.आज नागपूरचा सुध्दा विकास झपाट्याने होत यात दुमत नाही. परंतु आयटी सेक्टर किंवा इतर फिल्डमधील युवकांना आपले घरदार सोडून दुसऱ्या शहरात धाव घ्यावी लागते ही नागपूर सारख्या उपराजधानीची शोकांतिकाच म्हणावी लागेल.उदाहरण द्यायचे झाले तर,आज इंजिनिअरिंग केलेल्या विद्यार्थ्यांना पुण्या-मुंबईत ५० हजारांच्यावरती पगार मिळतो आणि उपराजधानी सारख्या नागपूर शहरात १५ ते २० हजार रुपये पगार मिळतो अशी तफावत का? राज्य एकच आहे,शिक्षण एकच आहे, पदवी एकच आहे परंतु



युवा वर्गाच्या भविष्यासोबत खिलवाड का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.आज नागपूरातीलच नाही तर संपूर्ण विदर्भातील मोठ्या प्रमाणात युवावर्ग नौकरीच्या शोधासाठी पुण्या-मुंबईकडे धाव घेत आहे ही कल्पना सरकारला का नाही? यावरून स्पष्ट होते की,आज जो युवावर्ग इंजिनिअर झालेला आहे त्याच्या पसंतीचा जॉब किंवा नौकरी त्याला नागपूरात मिळत नसावी किंवा त्याच्या शिक्षणानुसार त्याला पगार मिळत नसावा म्हणूनच नागपूरसह विदर्भातील युवावर्ग राज्यातील पुणा-मुंबई किंवा इतर भागांची पसंत करत असावेत.आपली संस्कृती सांगते की, मुलांनी आई-वडीलांचा सांभाळ केला पाहिजे. अहो ज्याठिकाणी आई-वडील रहातात त्या ठिकाणी जर मुलांना योग्य आणि त्यांच्या शिक्षणानुसार नौकरीच ( जॉब ) मिळत नसेल तर त्याला नाईलाजास्तव जॉबसाठी आई-वडिलापासुन दुर जावे लागते आणि



याला जबाबदार सरकार असल्याचे मी समजतो.अहो विदर्भातील मुलांना त्यांच्या मनालायक नौकरी मिळत नाही किंवा पगार नाही,मग सहाजीकच आहे त्यांना आई वडील आणि घरदार सोडून बाहेर जावेच लागेल. पहिलेच राज्यांमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि आता त्यात भर घालण्याचे काम एआय करीत आहे यामुळे काही काळात आयटी सेक्टर सुद्धा धाराशाही होण्याची होण्याच्या मार्गावर असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.असेही सांगण्यात येते की, पुढील काही वर्षांत महाराष्ट्र जगातील १३ वी अर्थव्यवस्था होईल असे भाकीत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्तविले आहे ही अत्यंत आनंदाची व गौरवास्पद बाब आहे. परंतु संपूर्ण महाराष्ट्र रोजगारीच्याr बाबतीत सक्षम झाला आहे का, सर्वांना मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत का ?याचा विचार सरकारने करने गरजेचे आहे. आज आपण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुदृढ आहे असे आपण सांगतो.परंतु राज्यातील विदर्भासह अनेक क्षेत्रातील युवा वर्ग शिक्षणासाठी व नौकरीसाठी आपले मुळ क्षेत्र सोडून राज्याच्या इतर भागात किंवा देशाच्या इतर भागात जातो याचे मुख्य कारण काय याचाही अभ्यास राज्याच्या अर्थतज्ज्ञांनी करण्याची गरज आहे.असे सांगितले जाते की परदेशातील थेट परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे,मग असे असुनही राज्यातील काही भागांतील युवावर्गांना समाधानकारक जॉब व पगार का मिळत नाही? देशातील एकूण गुंतवणूकीपेक्षा ३९ टक्के परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात असल्याचे सांगितले जाते,मग राज्यातील संपूर्ण भागात भरघोस रोजगार निर्मिती का नाही? असे अनेक प्रश्न आजही राज्याच्या जनतेपुढे उपस्थित होतात.त्यामुळे सरकारने अर्थव्यवस्थेप्रमाणे रोजगार निर्मिती व वाढत्या महागाईनुसार रोजगारांना पगार दिले पाहिजे. सरकारने फक्त आश्वासने किंवा घोषणाबाजी करून चालणार नाही तर या संपूर्ण गोष्टी कृतीत बदलविल्या पाहिजे. त्याचप्रमाणे राज्याचा विकास भरभराटीला न्यायचा असेल तर सर्वप्रथम वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.कारण महागाई सर्वच गोष्टींमध्ये अडचण निर्माण करीत असते. राज्यातील १० टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईनुसार डीए मिळत असतो याचे स्वागतच,परंतु त्याचा परिणाम ८० टक्के शेतकरी, शेतमजूर, गरीब, सर्वसामान्यांना भोगावा लागतो.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम महागाईवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आपण आपल्या अर्थव्यवस्थेनुसार राज्याचा विचार केला तर आपण सर्वच बाबतीत सक्षम असायला पाहिजे होते.परंतु आजही राज्याच्या अती दुर्गम भागात मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत.यामुळेच आपल्याला अती दुर्गम भागात आजही कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.अशाप्रकारे आजही राज्यात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत यावर सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे.

■ **लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**

# देशातील सर्वात भव्य संत तुकाराम महाराजांचे मंदिर लातूरात व्हावे : आ. रमेशआप्पा कराड

■ लातूर प्रतिनिधी

लाखो लोकांना एकत्र आणण्याची खरी ताकद फक्त संताच्या विचारात आणि वाणीत आहे जोपर्यंत सांप्रदाय जिवंत आहे तोपर्यंत सर्व समाज जिवंत असेल सांप्रदाय टिकला तरच जग टिकणार असून देशातील सर्वात भव्य जगद्गुरु तुकाराम महाराजांचे मंदिर लातूरात व्हावे, जिथे संकल्प असतो तिथे कसलीही अडचण येत नाही असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या वैकुंठगमन, श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी आणि कैवल्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलीच्या ७५० व्या जन्म उत्सव सोहळ्यानिमित्त लातूरनजीक खंडापूर गावाजवळ अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यानिमित्ताने संतांचा मेळा आणि वारकऱ्यांचा कुंभमेळा होत आहे. या अभूतपूर्व सोहळ्यात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड यांनी शनिवारी सहभागी होऊन विविध संतांच्या पादुकाचे भक्तीभावे दर्शन घेतले.



हभप गुरुवर्य ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांच्या प्रवचनानंतर त्यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

यावेळी शुभेच्छा देताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, खंडापूर परिसरात साधुसंताचा मेळा होतोय या निमित्ताने देहूचे तुकाराम महाराज, आळंदीचे ज्ञानेश्वर माऊली आपल्या परिसरात आले त्यांचे दर्शन आणि आशीर्वाद आपल्याला मिळत आहेत. खरोखरच आम्ही सर्वजण नशीबवान आहोत. एवढा मोठा सप्ताह देशात कुठे झाला असेल असे मला वाटत नाही, भविष्यातही अशीच संधी लातूरकरांना मिळावी सेवेसाठी लातूरकर कुठेही कमी पडणार नाही याची मला खात्री आहे. लाखो लोकांना एकत्र आणण्याची खरी ताकद फक्त संताच्या विचारात आणि वाणीत आहे. जोपर्यंत सांप्रदाय जिवंत आहे तोपर्यंत सर्व समाज जिवंत आहे.

सप्ताह परिसरात जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे मंदिर उभारण्याची संकल्पना पुढे आली. हे मंदिर देशातील सर्वात भव्य मंदिर व्हावे जिथे संकल्प सत्य असतो तिथे कुठलीही अडचण येत नाही या मंदिर उभारणी बरोबरच प्रति देहू उभे राहावे अशी इच्छा व्यक्त करून संत महात्मे जे आज्ञा, सूचना, आदेश करतील ती सेवा देण्याचे काम मी आणि माझा परिवार करेल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, संप्रदाय टिकावा यासाठी मी माझ्या लातूर ग्रामीण मतदार संघातील तब्बल ५५० भजनी मंडळांना भजनाच्या साहित्याचे वाटप केले असल्याचे बोलून दाखवले.

आप्पाचा विषय लय हार्ड आहे त्यांच्याकडे क्रेडिट कार्ड आहे असे बोलून माऊली कदम महाराज यांनी शेवटच्या दिवशी होणाऱ्या पुरणपोळी जेवणाकरिता दुधाची अपेक्षा व्यक्त केली. सर्वांच्या आशीर्वादाने लातूर ग्रामीण मतदार संघाची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी लागेल तेवढे दूध आणि तूपही देऊ असे जाहीर केले त्याचबरोबर या सप्ताहाच्या नियोजनासाठी अकरा लक्ष रुपयाची यावेळी मदत केली. रस्त्याच्या कडेने फिरून पोट भरणाऱ्या भिकाऱ्याला कोविड झाला नाही मात्र करोडपती, आरोबोपतीचा ऑक्सिजन अभावी मृत्यू झाला हे सत्य आहे. सांप्रदाय टिकला तर जग टिकणार याचा प्रत्यय कोरोना काळात सर्वांना आला असल्याचेही त्यांनी बोलून दाखवले.

यावेळी भाविक भक्त महिला पुरुष प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. आ. कराड यांच्यासमवेत भाजपाचे प्रदीप पाटील खंडापूरकर, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, बन्सी भिसे, उद्धव काळे, सतीश आंबेकर, अनंत चव्हाण, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, शरद दरेकर, साहेबराव मुळे, सुरज शिंदे, दीपक वांगसकर, राजकिरण साठे, ज्ञानोबा भिसे, वसंत करमूडे, अनंत पाटील, मारुती शिंदे, चंद्रकांत कातळे, राम मोरे, रवींद्र नागरगोजे, धनराज शिंदे, संतोष चव्हाण, लक्ष्मण खलंग्रे, किरण मुंडे, प्रशांत शिंदे, अक्षय भोसले, शंकर चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, देवराव मोहिते, बंटी शिंदे, ओम चव्हाण, रवींद्र पाटील, बालाजी गवळी, एम. डी. मुळे, दत्ता सप्ताळ, गोविंद मुंडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी व इतर अनेक जण होते.

## वाईट विचार, व्यसनं आणि सवयींना जाळून होळी करा : मानसोपचार तज्ज्ञ डॉ .राजेश इंगोले यांचे आवाहन

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

होळी सणानिमित्त सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी समाजाला आवाहन केले आहे की, यंदाची होळी ही केवळ रंगांचीच नव्हे, तर आपल्या जीवनातील वाईट सवयी, वाईट विचार आणि व्यसनांची होळी ठरावी. त्यांनी सांगितले की, वाईट सवयी आणि व्यसनांमुळे माणसाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उध्वस्त होत आहे. चला तर मग या होळीला आपण या सवयींच्या नकारात्मक चक्रातून बाहेर पडण्याचा संकल्प करूया..!

होळी सणानिमित्त सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी समाजाला आवाहन केले आहे की, यंदाची होळी ही केवळ रंगांचीच नव्हे, तर आपल्या जीवनातील वाईट सवयी, वाईट विचार आणि व्यसनांची होळी ठरावी. त्यांनी सांगितले की, वाईट सवयी आणि व्यसनांमुळे माणसाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उध्वस्त होत आहे. चला तर मग या होळीला आपण या सवयींच्या नकारात्मक चक्रातून बाहेर पडण्याचा संकल्प करूया. डॉ.इंगोले यांनी पुढे सांगितले की, वाईट सवयी सोडण्यासाठी पहिला टप्पा म्हणजे त्या सवयींची जाणीव होणे आणि त्यांच्यापासून दूर राहण्याचा दृढनिश्चय करणे. व्यसन किंवा वाईट सवयींमुळे होणाऱ्या हानीबद्दल लोकांना जागरूक करणे गरजेचे आहे. आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याला हानी पोहोचवणाऱ्या गोष्टींची होळी करून आपण एक नवीन सुरुवात करू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. अनेक वाईट सवयी या माणसाला आपोआप मानसशास्त्रातील प्लेजर प्रिंसिपलनुसार अर्थात मनाला तात्पुरतं समाधान, आनंद देणाऱ्या तत्वानुसार लागत असतात आणि त्या दिवसेंदिवस वाढत असतात. या लागलेल्या वाईट सवयींना आपले मन आणी शरीर सरावून जात आणि ती सवय आपल्याला



दैनंदिन गरज भासते. परंतु, प्रत्येक व्यक्तीने हे समजून घेणे गरजेचे आहे. की, या सवयी जशा आपण स्वतःहून लावून घेतल्या आहेत. तसेच आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास या सवयी आपण निश्चितपणे सोडवू शकतो. उदारणार्थ : दारू, गांजा, तंबाखू, अतिखाने, अतिझोपणे, अभ्यास न करणे यामुळे तात्पुरते समाधान मिळत असते. म्हणून मानवाच्या मूळ स्वभावानुसार या सवयी जीवनाचा भाग बनून जातो. परंतु, ज्या वेळेस या वाईट सवयींबद्दल माणूस स्वतःला या सवयींचे होणारे दुष्परिणाम समजून सांगेल किंवा या सवयींमुळे आपल्या जीवनामध्ये कसा नकारात्मक परिणाम होत आहे हे समजण्याची प्रक्रिया जागृत करेल, त्यावेळी मनोनिग्रहाच्या आधारे व्यक्ती आपल्या सवयी सोडू शकतो. मादक पदार्थांच्या बाबतीत ही व्यसने मानवाच्या मेंदूतील पेशींना जागृत करण्याचे काम करीत असतात. संवेदनशील करण्याचे काम करीत असतात. त्यामुळे ठराविक वेळेला या पेशी ते पदार्थ शरीरामध्ये पोहोचले पाहिजेत, यासाठी क्रेविंग निर्माण करत असतात आणि ही क्रेविंग निर्माण झाल्यानंतर तो व्यसनी व्यक्ती त्यावेळेला ती व्यसने घेण्याचा प्रयत्न करतो आणि त्या वेळेमध्ये त्याला ती व्यसने न मिळाल्यास त्याला तीव्र स्वरूपाची बेचैनी, छातीत धडधड, थरथरी सुटणे, झोप न येणे, चिडचिड होणे, राग येणे घाम येणे, चक्कर येणे, पोटात दुखणे अशा विविध प्रकारची लक्षणे येऊ शकतात. परंतु, मानसोपचार तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य औषधोपचार तसेच समुपदेशन केल्याने या व्यसनांची तीव्रता कमी होण्यास मदत होते आणि काही काळानंतर या व्यसनांची मेंदूला आणि शरीराला गरज वाटत नाही. अशाप्रकारे अनेक वाईट सवयी व व्यसने आयुष्यातून सोडविली जाऊ शकतात. यासोबतच चांगल्या सवयी लावण्यासाठी काही टिप्स देखील आहेत. वाईट सवयींच्या जागी चांगल्या सवयी विकसित केल्यास त्या सोडणे सोपे जाते. उदाहरणार्थ, तणावग्रस्त झाल्यावर सिगारेट ओढण्याऐवजी खोल श्वास घेणे किंवा ध्यानधारणा करणे, मोबाईल टीव्हीच्या ऐवजी खेळात किंवा वाचनात मन रमविणे यासारख्या पर्यायांचा अवलंब केला जाऊ शकतो. मनाची आणि शरीराची काळजी घेतल्यास आपण दीर्घकाळ निरोगी आणि आनंदी राहू शकतो. त्यामुळे या होळीला फक्त बाहेरच्या रंगांनीच नव्हे, तर जीवनातील वाईट सवयी, व्यसने आणि विचारांनाही निरोप देऊन साजरी करावी असे आवाहन डॉ.इंगोले यांनी होळीच्या पूर्वसंध्येस सर्वांना केले आहे.

**■ लेखक ~ डॉ.राजेश इंगोले (मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ, समाधान मानसोपचार रूग्णालय, अंबाजोगाई.) मोबाईल नंबर-9422240710**

## गावाच्या सर्वांगीण विकासाचा आदर्श नमुना : सरपंच आबासाहेब पांडे यांचे उल्लेखनीय कार्य.

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

गेल्या ३५ वर्षांपासून विविध कारणांमुळे रखडलेली विकासकामे अवघ्या ३ वर्षांत पूर्ण करून गावाच्या विकासाला नवी दिशा देण्याचे उल्लेखनीय कार्य सरपंच आबासाहेब पांडे यांनी करून दाखवले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गाव आज प्रगतीच्या नव्या उंबरठ्यावर उभे असून सर्वत्र समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावातील अनेक वर्षांचा सांडपाणी व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावत प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचविण्याची प्रभावी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भव्य समाज मंदिराचे बांधकाम, अंडरग्राऊंड नाली प्रकल्प आणि सुसज्ज स्मशानभूमी उभारून मूलभूत सुविधांची मोठी उणीव भरून काढण्यात आली आहे.

गाव स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी राहावे यासाठी



विशेष उपक्रम राबविण्यात आले. घरोघर डस्टबिनचे वाटप, दररोज फिरणारी घंटागाडी सेवा आणि गावाबाहेर कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र 'वेस्ट मॅनेजमेंट रूम' उभारण्यात आली आहे. त्यामुळे कचरा इकडे-तिकडे न टाकता योग्य पद्धतीने त्याचे व्यवस्थापन होत असून हा पर्यावरणपूरक उपक्रम आदर्शवत ठरत आहे.

ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून श्रमदान मोहीम राबवून सामाजिक एकोपा बळकट करण्यात आला आहे.

गावातील सर्व गल्ली-बोळांमध्ये रस्त्यांची कामे सुरू असून विकासाचा वेग प्रत्येक वस्तीपर्यंत पोहोचत आहे.

महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात आणि बसस्टॉपजवळ स्वच्छतागृह उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच तालुका स्तरावरील विविध कामांमध्ये स्वतः पुढाकार घेऊन ती मार्गी लावण्याची त्यांची कार्यपद्धती कौतुकास्पद ठरत आहे. गावातील दवाखान्याला सातत्याने सहकार्य देत आरोग्य सेवेलाही त्यांनी बळकटी दिली आहे.

दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि कार्यतत्परतेच्या जोरावर सरपंच आबासाहेब पांडे यांच्या नेतृत्वाखाली गाव विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. ग्रामस्थांच्या मनात विश्वास निर्माण करणारे नेतृत्व म्हणून त्यांच्या कार्याचे आहे

## दुसऱ्याकडे चांगल्या दृष्टिकोनातून पहा : माऊली महाराज खडकवाडीकर

■ नांदेड/प्रतिनिधी

कलियुगात स्वतःचं चांगलं करून घ्यायचं असेल तर भगवंतांच्या नामस्मरणासोबतच दुसऱ्याकडे चांगल्या दृष्टिकोनातून पहाल तरच आपलं चांगलं होण्याची अपेक्षा पूर्ण होतील असे आश्वासीत हभप माऊली महाराज खडकवाडीकर यांनी केले. प्रसिद्ध उद्योजक अनिल शेटकार यांच्या मातोश्री श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांच्या स्मृति महोत्सवात करडखेड येथील त्यांच्या समाधी स्थळी आयोजित कीर्तन रुपी सेवेत निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म निर्धार हे वर्म चुकू नये. संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या ४ चरणांच्या अभंगावर देवावरील भाव व स्वतःचे कर्म याबाबत अनेक दृष्टांत देऊन भक्तीचा मार्ग सांगितले.

आयोजित कार्यक्रमात सर्वप्रथम कार्यक्रमाचे संयोजक प्रसिद्ध उद्योजक अनिल शेटकार व त्यांच्या अर्धांगिनी सौ. आशाताई शेटकार यांनी भगवान परमात्मा विठ्ठल व मातोश्री श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून, अभिवादना नंतर दीप प्रज्वलनाने कीर्तन रुपी सेवेला सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना हभप माऊली महाराज खडकवाडीकर म्हणाले मृत्यु लोकात सुखाचा विचार नाही, पण सुख आहे ते संतांच्या संगतीत.

मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा, लेकरांना चांगले शिक्षण ,संस्कार



द्या ज्यांचे मुल निर्व्यासनी आहेत तो माणूस सर्वात श्रीमंत आहे. ज्यांच्याकडे श्रीमंती आहे बाबांनो त्यांच्याकडे श्रीमंती बरोबर दया असली पाहिजे, तरच त्या श्रीमंतीला महत्व आहे म्हणून प्रत्येकाने दानधर्म, दया गुणधर्म अंगीकारावे असे सांगून कार्यक्रमाचे संयोजक अनिल शेटकार यांचे त्यांच्या आईबद्दल असलेली त्यांची निष्ठा , कार्य कृत्तवावर प्रकाश टाकत असतांना उपस्थित भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले होते. सतत दोन दिवस चालणाऱ्या स्मृती महोत्सव, स्मरण वात्सल्याचे या कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी श्रीश्री ष. ब्र.१०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज उदगीर यांच्या हस्ते श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांच्या समाधीचे पूजन व नांदेड येथील प्रसिद्ध गायक दिवाकर चौधरी यांचा स्वर- तरंग कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन कार्यक्रमासह महाप्रसादाचा लाभ घेतला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक पाटील, शंकर शिळवणे, किशोर पाटील, श्रीनिवास मंदिलवार, राजू पाटील गोपछडे, सुरेश शेटकार पाटील, सुनील चमकूरे, शंकर शेटकार, जयराम पांचाळ, दिगंबर कोकणे, शिऊ शेटकार, लक्ष्मण बिरादार कावळगावकर, कैलास यसगे, बंडू पाटील बोरगावकर आदींनी परिश्रम घेतले.

## सांगलीत मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण

### सांगली जिल्हा परिषद आणि जिल्हा ग्रंथालयाचा संयुक्त उपक्रम

■ शिराळा प्रतिनिधी

मराठी भाषा पंधरवडा निमित्त व मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून मराठी भाषा संवर्धनासाठी आणि मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद ,सांगली व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी साहित्यातील थोर साहित्यिक,कवी कुसुमाग्रज वि.वा.शिरवाडकर यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिन शांतिनिकेतन लोक विद्यापीठ सांगली येथे साजरा करण्यात आला .

याप्रसंगी सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे,, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनवणे, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड, ग्रामीण कथाकार बाबासाहेब परीट, साहित्यिक विठ्ठल मोहिते, गौतम कांबळे, प्रभारी उपशिक्षणाधिकारी डॉ. विमल माने प्रमुख उपस्थित होते.

प्रास्ताविक आणि स्वागत मोहनराव गायकवाड यांनी केले. याप्रसंगी ते म्हणाले , माझा मराठीची बोलु कौतुके... परी अमृतातेंही पैजा जिंकणारी आपली मराठी भाषा आहे. आज माय मराठी भाषेचा गौरव दिन आहे.

मराठी भाषा पंधरवड्यानिमित्ताने घेतलेल्या विविध भाषिक स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर एकूण २०६ स्पर्धक सहभागी झाले होते . त्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय असे एकूण ७२ स्पर्धक बक्षीसपात्र झाले. प्राथमिक विभाग जिल्हा परिषद, सांगली यांनी मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अभिवाचन स्पर्धा, चारोळी /घोषवाक्य, निबंधलेखन स्पर्धा, चित्रकला व पोस्टर स्पर्धा, सुलेखन /हस्ताक्षर स्पर्धा, पुस्तक वाचन अभिप्राय/ मी वाचलेले पुस्तक अभिप्राय स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धा इयत्ता १ ली ते ५ वी तसेच इयत्ता ६ वी ते ८वी, इयत्ता ९वी ते १२ वी व खुलागट या सर्वांसाठी आयोजित केल्या होत्या. वक्तृत्व व अभिवाचनासाठी खुला गट ठेवण्यात आला होता . तसेच या स्पर्धकांचा सन्मान प्रमाणपत्र, गुलाबपुष्प देऊन माननीय जिल्हाधिकारी अशोक काकडे व अमित



सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, मुलांच्या वक्तृत्वात ओघवतेपणा ,गोडवा याचबरोबर आशयसमृद्धताही असायला पाहिजे. आपली मायबोली आपल्याला आई प्रमाणे शिकवते. नाती जोडते. माया, प्रेम ,आपुलकी शिकवते. संतांनी आपली भाषा अधिक समृद्ध तर केलीच परंतु तत्त्वज्ञान साध्या-सोप्या भाषेत आपल्यापर्यंत पोहोचवले . छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी राजव्यवहार भाषाकोश निर्माण केला. आपण आपल्या मराठी भाषेतील उत्तम साहित्य वाचून आपलं जीवन घडवण्याबरोबरच परभाषाही अवगत करावी. ग्रंथसंपदा आपणांस दुसऱ्याने जगलेले शहाणपण शिकवते काही पानांत आपण ते शिकतो. संत ज्ञानेश्वरांनी मायबोली मराठीतून भगवद्गीता आपणास सांगितली... आईची बोली ती आपली मायबोली आहे. ही मायबोली बोलीतून प्रेम व्यक्त करते तसेच ती प्रसंगी कठोर होऊन आपल्याला शिस्त शिकवते . बारा वर्षाचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास भोगून आलेल्या पांडवांच्या आई म्हणजे एक स्वाभिमानी स्त्री. या स्वाभिमानी स्त्रीने आपल्या मुलांच्या मनामध्ये आपल्या मायबोलीतून चेतना भरण्याचे काम केले. पांडवांनी त्यांना विजय मिळवून दिला. तर मुलांच्यात चैतन्य, चेतना भरण्याचे काम मायबोली करते. आपल्या मायबोलीला आपण सोन्याच्या सिंहासनावर बसता येईल एवढी मोठी करूयात. भूगोल इतिहास एकत्र करून तिला मोठे करूयात.कवी कुसुमाग्रज यांनी सांगितल्याप्रमाणे माझ्या मराठी मातीचा ...लावा ललाटीस टिळा... या पद्धतीने कामकाज करूयात... तुम्हाला पुन्हा एकदा मराठी गौरव दिनाच्या खूप खूप शुभेच्छा. राजवर्धन मदने, वेदिका जाधव, विश्वास घोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल मोहिते यांनी केले.